महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१

Website - www.msbsd.edu.in  Email - secretary@msbsde.edu.in  दुरध्वनी क्र. ०२२-२६४७४४३५

पत्र क्र. का.क्र./मान्यता/२०२२/८३१  दिनांक २०.०५.२०२२

प्रति,

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय (सर्व)

विषय: प्रवेश सत्र २०२२-२३ पासुन मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या नवीन संस्थांना व अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ तुकडी सुरू करण्यास मान्यता देण्यासंबंधीत कार्यवाहीबाबत...

संदर्भ:

१. मंडळाचे पत्र क्र. मान्यता /का.क्र.०१/२०२२-२३/७८२, दि.०४.०५.२०२२

२. शासन पत्र क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.८०/कौशल्य-२, दि. १३.०५.२०२२

१. प्रवेश सत्र २०२२-२३ पासुन मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या नवीन संस्थांना व अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ तुकडी सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत वेळापत्रक मंडळाच्या संदर्भीय पत्र क्र. ०१ अन्वये निर्गमित करण्यात आले होते.

२. संदर्भीय शासन पत्र क्र. ०२ अन्वये मंडळामार्फत राबविण्यात येणारे (संगणक/ तांत्रिक/ अतांत्रित/ पॅरामेडिकल गट) सहामाही, एक वर्ष व दोन वर्ष कालावधीचे प्रमाणपत्राकरिता उपलब्ध विषयाचे NSQF Aligned, सेक्टर स्कील कॉन्सिलचे कोर्सेस करण्यात यावे असे निर्देश मंडळास प्राप्त झाले आहेत. तसेच NSQF Course Mapping पूर्ण होईपर्यंत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता मंडळाचे अभ्यासक्रम राबविण्यासंदर्भातील मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव स्विकारण्यात येवू नयेत व शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात येवू नयेत असे निर्देश मंडळास प्राप्त झाले आहेत.

३. शासनाकडून प्राप्त सदर निर्देशाच्या अनुषंगाने आपणांस सूचित करण्यात येते की, प्रवेश सत्र २०२२-२३ पासुन मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या नवीन संस्थांना व अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ तुकडी सुरू करण्यास मान्यता देण्यासंबंधी प्रस्ताव पुढील पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत स्वीकारण्यात येवू नयेत व/वा मंडळाकडे सादर करण्यात येवू नयेत.

(योगेश सुरेश पाटील)
संचालक

**प्रत: माहितीसाठी**

१. मा.प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मुंबई ३२

२. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

१. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
२. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या मान्यता प्राप्त व इच्छुक संस्था
३. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)
४. निवडनस्ती